म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा.वा.
दा. क्र. २५३०

२५३०

# वैचलेला

# रले


IRBK-0102530
IRBK-0102530

आणि

ह. साठे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय -वाङ्मय
वा. नं. १५०

वा. नं.



# वेचलेलीं रत्नें

पु. य. पाठक
रा. दि. देसाई

र्नाटक पब्लिशिंग हाउस मुंबई

वा. क्र. 2430

# वेचलेलीं रत्नें

## भाग दुसरा

म. ग्रं. सं. ठाणें.
2430

लेखक

पुंडलिक यशवंत पाटकर
राजाराम दिवाकर देसाई
अध्यापक, इं. ए. सो. चें स्पेशल प्रा. स्कूल, दादर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
क्र. 2430
IRBK-0102530
IRBK-0102530

कर्नाटक प्रकाशन संस्था, मुंबई २

मूल्य सहा आणे

# अनुक्रमणिका

| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | मृत्यूला फसविलें | ३ |
| २ | आपल्या राज्याची मागणी | ६ |
| ३ | दुष्यंत राजा | ८ |
| ४ | अयोध्येचा राजा | १२ |
| ५ | नळ-दमयंतीचा वनवास | १६ |
| ६ | भीष्म | १९ |
| ७ | मूर्तीनें विद्या शिकविली | २२ |
| ८ | गमतीदार राक्षस | २४ |
| ९ | नदींत सांपडलेला मुलगा | २७ |
| १० | आस्तिक | ३० |

प्रथमावृत्ति : १९४२
द्वितीयावृत्ति : १९४४
पुनर्मुद्रण : १९४६

[ सर्व हक्क स्वाधीन ]

Printed by B. G. DHAWALE, at the Karnatak Printing Press, and published by him for the Karnatak Publishing House, Shri Samarth Sadan : 2, Chira Bazar, Bombay 2.

# १. मृत्यूला फसविलें

फार फार वर्षांपूर्वी मद्रदेशचा एक राजा होता. त्याचें नांव अश्वपति. फार चांगला राजा होता तो. राजाला इतर सर्व सुख होतें, पण मूळबाळ नव्हतें. म्हणून राजानें सावित्री देवीची भक्ति केली. पुढें देवीच्या कृपेनें राजाला एक सुंदर मुलगी झाली. राजानें तिचें नांव सावित्री असें ठेविलें.

होतां होतां सावित्री मोठी झाली. राजानें तिला बोलाविलें आणि सांगितलें, "सावित्री, आतां तुझें लग्न केलें पाहिजे. तुझ्याबरोबर प्रधानास देतों. तूंच आपल्याला वाटेल तो नवरा पसंत कर." शोध केल्यावर, एका आश्रमांत तिला मनाजोगता पण गरीब असा नवरा आढळला व त्याच्याशींच लग्न करण्याचें तिनें ठरविलें.

सत्यवान त्याचें नांव. सत्यवानाचा बाप द्युमत्सेन म्हातारा झाला. शत्रूंनीं त्याला घालवून दिलें. त्याचें राज्य आपण घेतलें. राजा, राणी व मुलगा सत्यवान हीं रानांत झोपडी बांधून राहूं लागलीं. आईबाप म्हातारीं, आंधळीं; म्हणून सत्यवानास सर्व काम करावें लागे. सत्यवान गुणी होता. तो खोटें बोलत नसे. वाईट काम करीत नसे. तो दिसायला फार सुंदर होता. रानांत त्यांचे फार हाल होत. पण सावित्रीनें हाच नवरा पसंत केला.

सावित्रीनें बापाला सर्व हकीगत सांगितली. राजाला आनंद झाला. राजानें रथ जुंपायला सांगितला व आपण द्युमत्सेनास जाऊन भेटला. द्युमत्सेन म्हणाला, "राजा, आम्ही गरीब. राज्य शत्रूंनीं घेतलें आहे; अरण्यांत

आहोंत. तुझ्या मुलीचे हाल होतील." अश्वपति म्हणाला, "सावित्रीला सर्व माहीत आहे. तिला हें पसंत आहे; म्हणून आपण नाहीं म्हणूं नये." मग द्युमत्सेन कबूल झाला. अश्वपतीला नारदानें सांगितलें, "राजा, सत्यवान आजपासून एक वर्षानें मरेल, म्हणून सावित्री त्याला देऊं नको." पण सावित्री म्हणाली, "लग्न ठरलें; आतां त्यांच्याशींच लग्न करावयाचें." मग नारदानें तिला एक व्रत करण्यास सांगितलें. पुढें सत्यवान–सावित्रीचें लग्न झालें. सावित्री सत्यवानाबरोबर राहूं लागली. ती सासू–सासऱ्याची सेवा करी. सत्यवान-सावित्री आनंदांत होतीं. पुढें नारदमुनींनीं सांगितलेला दिवस जवळ येऊं लागला. आतां तर, चारच दिवस राहिले. सावित्रीनें व्रत सुरू केलें. तीन दिवस उपवास केला.

सत्यवान कुऱ्हाड घेऊन रानांत निघाला. आज सावित्रीला नवऱ्याची काळजी वाटत होती. मग सत्यवान-सावित्री रानांत गेलीं. सत्यवानानें फळें तोडलीं व लाकडें तोडूं लागला. तोडतां तोडतां तो दमला व सावित्रीला म्हणाला, "मला झोंप येते." सावित्रीनें त्याचें डोकें आपल्या मांडीवर घेतलें. आतां सावित्री फारच घाबरली. इतक्यांत तिला एक भयंकर पुरुष दिसला. सावित्री समजली. ती हळूच उठली. तिनें हात जोडले व म्हणाली, "महाराज, आपण कोण?" तो पुरुष म्हणाला, "सावित्री, तूं पतिव्रता आहेस, पुण्यवान आहेस; म्हणूनच मी बोलतों. मी यम आहें. राजपुत्र सत्यवानाला नेण्यास आलों आहें."

यम सत्यवानाचा प्राण नेऊं लागला. सावित्री त्याचे मागून जाऊं लागली. यम म्हणाला, "सावित्री, तूं येऊं नको." सावित्री म्हणाली, "महाराज, जिकडे माझा पति



जाईल, तिकडे मला गेलेंच पाहिजे. हा माझा धर्म आहे. तुम्ही मला दुःखांत लोटूं नका." यम म्हणाला, "सावित्री, मला तुझी दया येते. सत्यवानाच्या प्राणाखेरीज वाटेल तें माग पाहूं." सावित्री म्हणाली, "माझ्या सासऱ्याचें राज्य त्यांस मिळावें, त्यांना डोळ्यांनीं दिसावें, आणि मला शंभर भाऊ व्हावेत." यम म्हणाला,

"तसें होईल." मग सावित्रीनें यमाला नमस्कार केला, यमानें 'पुत्रवती भव' असें म्हटलें. सावित्री म्हणाली, "महाराज, आपलें म्हणणें खरें झालें पाहिजे. यासाठीं माझा पति मला परत द्या." यमाला सावित्रीचा पति परत देणें भाग पडलें. यम निघून गेला.

सत्यवान उठून बसला. त्याला सावित्रीनें सगळी हकीगत सांगितली. मग सत्यवान व सवित्री आश्रमाकडे चाललीं. राजाराणीला दिसूं लागलें. तीं काळजी करीत होतीं. इतक्यांत सत्यवान–सावित्री आलीं. सावित्रीनें नमस्कार केला. राजाराणीला सर्व हकीगत सांगितली. तेव्हां त्यांना अतिशय आनंद झाला. तीं सगळीं आनंदांत राहूं लागलीं.

अभ्यास :—( १ ) वटपौर्णिमेच्या दिवशीं काय काय करतात ? ( २ ) रानांतील कोणतीं फळें खातात ?

---

## २. आपल्या राज्याची मागणी

एकदां पांडवांबरोबर कौरव जुगार खेळले. तेव्हां पांडवांचें सर्व राज्य कौरवांनीं जिंकलें. कौरवांचा राजा दुर्योधन पांडवांना म्हणाला, " तेरा वर्षांनीं परत या; मग देईन तुमचें राज्य तुम्हांला. "

तेरा वर्षांनीं वनवासांतून पांडव आले व त्यांनीं कौरवां-जवळ आपलें राज्य मागितलें. पण दुर्योधनाला आतां राज्य परत देववेना ! तो म्हणाला, "आम्हीं तुमचें राज्य जिंकलें तें आतां आमचेंच आहे. राज्य घालविणारांना राज्य सांभाळतां कसें येणार !" पांडवांना फार वाईट

वाटलें; मग पांडवांनीं लढाईची तयारी केली. कौरवांनीं पण लढाईची तयारी चालविली.

कौरवांचे मित्र कौरवांच्या मदतीला आले. पांडवांचे मित्र व नातेवाईक पांडवांच्या मदतीस आले. पण कृष्ण होता दोघांचाहि पाहुणा! त्याला बोलविण्यासाठीं दुर्योधन व अर्जुन एकदमच गेले. कृष्ण झोंपला होता. दुर्योधनाला



वाटलें, आपण राजा, तेव्हां बसावें कृष्णाच्या उशाजवळ! तो उशाजवळ बसला व अर्जुन पायाजवळ बसला. कृष्ण उठून बसला तेव्हां त्याला प्रथम अर्जुन दिसला. मग मागें पाहिलें तेव्हां दुर्योधन दिसला. कृष्णानें दोघांसहि आपणापाशीं येण्याचें कारण विचारलें. अर्जुन म्हणाला, "देवा, तूं आमच्या मदतीस ये." दुर्योधन म्हणाला, "देवा, मी अगोदर आलों आहें, तूं मलाच मदत केली पाहिजे." कृष्ण म्हणाला, "तूं प्रथम आलास म्हणून तुला व अर्जुन प्रथम दिसला म्हणून अर्जुनाला, अशी दोघांनाही मदत केली पाहिजे. तेव्हां एकानें मला घ्यावें व दुसऱ्यानें माझें सर्व सैन्य घ्यावें. बोला, कोणाला काय पाहिजे?"

दुर्योधनानें सैन्य पसंत केलें; परंतु अर्जुनानें कृष्णालाच घेतलें. नंतर दोघेहि आपापल्या घरीं आले.

आतां मोठी लढाई होईल, खूप लोक मरतील; म्हणून सर्वांना मोठी काळजी पडली. विदूर नांवाचा पांडवांचा एक चुलता होता. त्यानें लढाई न करण्याबद्दल दुर्योधनाला सांगून पाहिलें; पण हट्टी दुर्योधन म्हणाला, "पांडवांना पाऊलभरही जमीन देणार नाहीं." नंतर सर्वांच्या सांगण्यावरून कृष्ण गेला दुर्योधनाकडे. पण दुर्योधन पांडवांना थोडेंसुद्धां राज्य देण्यास कबूल होईना.

राज्याचे खरे मालक पांडव होते. कपटानें कौरवांनीं तें राज्य मिळविलें होतें, तेरा वर्षांनंतर त्यांचें राज्य त्यांस परत देण्याचें कौरवांनीं कबूल केलें होतें. बोलल्याप्रमाणें कौरव वागले नाहींत. मग कौरवांची व पांडवांची मोठी लढाई झाली. खूप दिवस चालली होती ती. कौरवांचे खूप लोक मेले. शेवटीं पांडवांनीं कौरवांपासून आपलें राज्य घेतलें. आपणांस चांगला राजा मिळाला, म्हणून सर्व लोकांस आनंद झाला.

अभ्यास :—( १ ) पूर्वी कोणत्या हत्यारांनीं लढाई करीत असत? कौरव किती व पांडव किती? पांडवांचीं नांवें सांगा. ( २ ) हल्लींचीं हत्यारें शिक्षकांस विचारा व त्यांचीं चित्रें जमवा. ( ३ ) दुर्योधन कृष्णाच्या उशाजवळ कां बसला? (४) अर्जुनाच्या रथाचें चित्र पहा.

## ३. दुष्यंत राजा

आपल्या या देशांत, दुष्यंत नांवाचा राजा होऊन गेला. हा दुष्यंत राजा फार शूर होता; तसाच तो गुणीही होता. त्याला शिकारीची तर फारच आवड होती.

एके दिवशीं तो शिकारीसाठीं रानांत गेला. खूप फिरला; पण शिकारच कांहीं मिळेना. फिरतां फिरतां रानांत बराच दूर गेला; त्याला एक हरीण दिसला. राजाला आनंद झाला. राजा त्या हरणावर बाण सोडणार इतक्यांत "राजा, थांब! त्या हरणाला मारूं नकोस." असे शब्द त्याला ऐकूं आले. लगेच दोन ऋषिकुमार तेथें आले व म्हणाले, "राजा, हा हरीण कण्वमुनींच्या आश्रमांतला आहे. हा पाळलेला आहे; तेव्हां याची शिकार करतां येणार नाहीं. तूं दमलेला दिसतोस. आश्रमांत चल; आश्रम जवळच आहे." राजा खराच दमला होता. तो विश्रांतीसाठीं आश्रमांत गेला.



आश्रमांत कण्वमुनी नव्हते. त्यांनीं पाळलेली मुलगी शकुंतला ही होती. ती फारच सुंदर होती. विश्रांती घेतल्यामुळें व फळें वगैरे खाल्ल्यामुळें राजाला हुशारी वाटली.

इतक्यांत त्या आश्रमांत एक समारंभ होणार होता; म्हणून ऋषिकुमारांनीं राजाला समारंभासाठीं आमंत्रण दिलें. राजाला सुद्धा तेथें राहावें असें वाटूं लागलें; राजानें आपलें सर्व सैन्य राजधानीस पाठविलें व आपण आश्रमांतच राहिला. राजा राहिल्यामुळें शकुंतलेस पण आनंद झाला.

समारंभांतील वेळ सर्वांनीं आनंदांत घालविला. राजा व शकुंतला दिवसेंदिवस एकमेकांस जास्त जास्त आवडूं लागलीं व त्यांचा विवाह झाला. मग कांहीं दिवसांनीं राजा आपल्या राजधानीस जावयास निघाला. शकुंतलेस फार वाईट वाटलें. दुष्यंत म्हणाला, "ही खुणेची आंगठी ठेव. मी तुला लौकरच घेऊन जाईन. तूं कांहीं वाईट वाटून घेऊं नकोस." राजा आपल्या राजधानीस निघून गेला. यावेळीं शकुंतला गरोदर होती.

पुढें कण्वमुनींना सर्व हकीगत कळली. त्यांना तर अतिशय आनंद झाला आणि त्यांनीं शकुंतलेस ऋषिकुमारांबरोबर दुष्यंत राजाकडे पाठवून दिलें. पण राजानें ओळखलेंच नाहीं तिला! शकुंतला खुणेची आंगठी ओळख पटविण्यासाठीं शोधूं लागली, पण आंगठीच सांपडेना! तिला वाईट वाटलें. ती रडूं लागली आणि पुन्हा कण्वमुनींकडे जाऊं लागली. जातां जातां वाटेंत एक चमत्कार झाला. आकाशांतून एक अप्सरा आली, तिनें शकुंतलेस उचललें आणि आकाशांत घेऊन गेली. ही अप्सरा शकुंतलेची आई होती. हिचें नांव मेनका. मेनकेकडे इंद्राच्या दरबारांत गायन करण्याचें काम होतें. शकुंतला

मेनकेकडे प्रसूत होऊन तिला मुलगा झाला; त्याचें नांव 'सर्वदमन' असें ठेवलें.

पूर्वीं स्नान करतांना शकुंतलेची आंगठी एका तलावांत हरवली होती. ती एका कोळ्याला सांपडली. कोळी ती विकूं लागला. पण तिच्यावर राजाचा शिक्का असल्यामुळें कोळ्याला पकडून राजाकडे नेलें. आंगठी पहातांच दुष्यंताला शकुंतलेची आठवण झाली व त्याला वाईट वाटूं लागलें; पण आतां उपयोग काय?

याचवेळीं एका राक्षसानें इंद्रावर स्वारी केली. इंद्राला तो मुळींच आटोपेना. तेव्हां इंद्रानें दुष्यंताला मदतीस बोलाविलें. दुष्यंत गेला आणि त्यानें इंद्राला मदत केली. राक्षस ठार झाला. इंद्राला आनंद झाला. इंद्रानें राजाचा गौरव केला. मग दुष्यंत राजा आपल्या देशास येण्यास निघाला. वाटेंत एक मुलगा सिंहाच्या छाव्याबरोबर खेळत होता. बरोबरच्या दासी त्या मुलाला सांगत "अरे, त्या सिंहाच्या पोराला सोड!" पण मुलगा त्याचें तोंड उघडून दांत मोजीत होता. हें पाहून राजाला कौतुक वाटलें. राजा मुलाजवळ गेला आणि म्हणाला, "बाळ, तुझें नांव काय?"

मुलगा :—माझें नांव सर्वदमन.

दुष्यंत :—तुझ्या बापाचें नांव काय?

मुलगा :—माझ्या बापाचें नांव, दुष्यंत राजा. तो पृथ्वीवर राज्य करतो.

हें ऐकतांच, राजाला आनंद झाला. "मीच तो दुष्यंत राजा." असें म्हणून राजानें सर्वदमनास उचलून घेतलें.

मग दुष्यंत राजा, शकुंतला होती तिथें गेला. नंतर शकुंतला दुष्यंत राजाबरोबर राजधानीस आली. मग दुष्यंतानें सर्वदमनाचें नांव 'भरत' असें ठेविलें. त्याच्याच नांवावरून या देशाला 'भरतखंड' हें नांव पडलें.

अभ्यास :—(अ) राजानें हरणाला कां मारलें नाहीं? (आ) इंद्र हा कोण? (इ) तुम्ही एखादी झोंपडी पाहिली आहे का? ती कशाची करतात? (ई) हरणांच्या पुष्कळ जाती आहेत; त्यांचीं चित्रें जमवा.

---

## ४. अयोध्येचा राजा

"माझ्या परीक्षेला राजा कसा उतरतो पाहातों!"

"खात्रीनें उतरेल! राजा हरिश्चंद्रासारखा उदार, बोलल्याप्रमाणें वागणारा, दुसरा कोणी सांपडणार नाहीं. आपण परीक्षा घ्याच एकदां."

"ठीक आहे."

वरील भाषण इंद्रसभेंतील आहे. सगळे देव, मुनी सभेला हजर होते. इतक्यांत नारदही आले. त्यावेळीं सहज इंद्रानें विचारलें, "नारदमुनी, तुम्हीं सगळीकडे फिरतां, आणि खूप खूप गमती पाहातां, तेव्हां कांहीं विशेष पाहिलें तर सांगा." नारदमुनी म्हणाले, "इंद्रा, मी फिरतां फिरतां अयोध्येस गेलों. तेथला राजा हरिश्चंद्र फारच गुणी, दयाळू, उदार आणि बोलल्याप्रमाणें वागणारा असा आहे. धन्य धन्य त्या राजाची!"

वसिष्ठमुनींना आपल्या शिष्याची वाखाणणी ऐकून आनंद झाला. ते म्हणाले, "खरें आहे नारदमुनींचें म्हणणें, राजा हरिश्चंद्र आहेच तसा गुणी."

हें वसिष्ठमुनींचें बोलणें विश्वामित्रमुनींना मात्र आवडलें नाहीं. कारण वसिष्ठ व विश्वामित्र यांचें कधीं पटत नसे. शेवटीं आरंभीं सांगितल्याप्रमाणें दोघांमध्यें बोलणें झालें आणि विश्वामित्रमुनींनीं राजाची परीक्षा घेण्याचें ठरविलें.



एके रात्रीं हरिश्चंद्र राजाला स्वप्न पडलें कीं एक ब्राह्मण आला आणि राज्य मागूं लागला. त्याला आपण सर्व राज्य दान दिलें.

सकाळीं राजा, तारामती व रोहिदास यांस स्वप्नाची हकीगत सांगत आहे, तोंच स्वप्नांत दिसलेला तो ब्राह्मण

खरोखरच तेथें आला आणि राज्य मागूं लागला. हा ब्राह्मण विश्वामित्रच होता आणि स्वप्नहि त्यानेंच पाडलें होतें. राजानें सर्व राज्य त्या ब्राह्मणास दिलें. ब्राह्मण म्हणाला, "राजा, दक्षिणा पाहिजे, एरवीं दान पुरें होत नाहीं." राजा पैसे देऊं लागला पण ब्राह्मण म्हणाला, "राजा, सर्व राज्य मला दिलेंस; तेव्हां तूं आतां सर्व दागदागिने, कपडे वगैरे उतरून ठेव. यांत तुझें कांहीं नाहीं. तूं तुम्हां तिघांनाही काशीला जाऊन वीक आणि माझी दक्षिणा पुरी कर."

शेवटीं ब्राह्मणाच्या सांगण्याप्रमाणें, राजा हरिश्चंद्र, राणी तारामती व मुलगा रोहिदास हीं काशीस गेलीं; त्या ठिकाणीं त्यांनीं आपणांस विकलें. कालकौशिक ब्राह्मणानें राणी तारामती व राजपुत्र रोहिदास यांस विकत घेतलें. राजास डोंबा महारानें विकत घेतलें. डोंबानें राजाला स्मशानांत पहारा करावयास ठेवलें. हे पैसे घेऊन राजानें ब्राह्मणाची दक्षिणा पुरी केली.

रोहिदास, कौशिकाचे घरीं फुलें, दुर्वा आणी. एके दिवशीं रोहिदास फुलांसाठीं बागेंत गेला असतां, तेथें त्याला साप चावला आणि रोहिदास मरण पावला. राणी रडून आकांत करूं लागली. कालकौशिकही आला आणि राणीला समजावून म्हणाला, "आतां झालें त्याला इलाज नाहीं. हें प्रेत स्मशानांत नेलें पाहिजे. तेथें पैसे द्यावे लागतात; म्हणून गुपचुप रात्रीं जाऊं आणि हें प्रेत जाळून टाकूं." रात्र झाली तेव्हां राणीनें रोहिदासाला

पोटाशीं धरलें आणि चालली रडत रडत. दिसत नव्हतें, पण कशीबशी ठेंचाळत स्मशानांत पोहोंचली.

इकडे एक ब्राह्मण लोकांना उगीच सांगत सुटला कीं एक राक्षशीण मुलांना खात आहे. चला दाखवतों तुम्हांला. हा ब्राह्मण विश्वामित्रच होता. लोक धांवत



धांवत आले. त्यांना खरेंच वाटलें. मग डोंबानें राणीला ठार करण्याचा हुकूम दिला. हें काम हरिश्चंद्राकडे होतें.

हरिश्चंद्र तरवार उगारून म्हणाला, "हं, आतां कर देवाचें स्मरण आणि तुला कांहीं सांगायचें असेल तर सांग." राणी म्हणाली, "माझ्यावर उगाच आळ आहे हा. माझा मुलगा रोहिदास मरण पावला, त्याला मी दहन करीत होतें." राजानें राणीला ओळखलें. राजाच्या डोळ्यांत अश्रू आले. पण ओळख न देतां हुकुमाप्रमाणें राजानें तरवार उचलली व घाव घालणार तोंच त्याचा हात वरचेवर धरला गेला. वसिष्ठमुनी, विश्वामित्रमुनी हजर झाले. त्यांनींच त्याचा हात धरला. ऋषींनीं रोहिदासाला जिवंत

केलें आणि राजाला म्हटलें, "राजा, हा तुझा मुलगा रोहिदास. तूं खरोखरच उदार आणि बोलल्याप्रमाणें वागणारा आहेस; मी हरलों. तुझें सर्व राज्य मी तुला परत दिलें आहे. तुम्ही आनंदानें आपलें राज्य चालवा." असें म्हणून विश्वामित्रमुनी निघून गेले.

अभ्यास :—( १ ) शब्द भरा:—( अ ) हरिश्चंद्र हा........ला राज्य करीत होता. त्याची राणी........व मुलगा ........आणि........मुनी, हे राजाचे गुरुजी होते.

( २ ) व्यवसाय:—तुम्हीं एखादी सभा भरली असतां पहा. त्या ठिकाणीं लोक कसे बोलतात, काय काय कामें होतात; तीं अवश्य पहा. सभेंत जो मुख्य इसम असतो, त्याच्या हुकुमानें कामें चालतात. त्याला काय म्हणतात? घरीं वडिलांना विचारून लिहून आणा.

---

## ५. नळ-दमयंतीचा वनवास

निषध देशाचा राजा वीरसेन याला एक मुलगा होता. तो गुणी, शूर तसाच दिसायलाही पण सुंदर होता. त्याचें नांव नळ. नळाला सर्व विद्या येत होत्या. रथ हांकणें ही एक विद्या आहे. ही विद्या पण नळाला चांगली येत होती. पुढें नळ राजा झाला.

विदर्भ देशाचा राजा भीम. त्याची मुलगी दमयंती. तिच्याशीं नळराजाचें लग्न झालें. दमयंतीला एक मुलगा व एक मुलगी, अशीं दोन मुलें झालीं. मुलाचें नांव इंद्रसेन व मुलीचें नांव इंद्रसेना.

राजा, राणी व मुलें आनंदांत रहात होतीं. एके दिवशीं नळराजाला वाटलें, फांशांनीं खेळावें. नळानें खेळण्यासाठीं पुष्कराला बोलाविलें. पुष्कर हा नळाचा

भाऊ. तो गरीब होता. त्याच्याजवळ फक्त एक बैल होता. आणखी कांहीं नव्हतें. खेळाचे वेळीं त्यानें पणाला बैलच लाविला ; पण नळानें राज्य लाविलें. पुष्करानें राज्य जिंकलें. नळाचें राज्य गेलें, दागिने गेले, कपडे गेले. राजा भिकारी झाला. पुष्करानें नळराजाला राज्याबाहेर घालविलें. राजा-राणी उपाशीं रानांत गेलीं. त्यांचे रानांत फारच हाल झाले. यावेळीं राजाचीं मुलें आजोळीं गेलीं होतीं.



राजा म्हणाला, "दमयंती, तूं माहेरीं जा." पण दमयंती जाईना. ती फार फार दमली, पुढें चालवेना, अशा स्थितींत तिला झोंप आली. ती झोंपली व राजा बसून पहारा करूं लागला. विचार करतां करतां नळराजाला वाटलें, आपण निघून जावें, राणी जागी होतांच मी नाहीं हें पाहून माहेरीं जाईल. नळ उठला व दमयंतीला तेथेंच सोडून गुपचूप निघून गेला.

पुढें जातां जातां नळाला एक जंगल जळत असतांना दिसलें. आणि त्या जळत्या जंगलांतून "नळा, मला वांचीव" असे शब्द ऐकूं आले. तिकडे नळराजा धांवत गेला. पाहातो तर एका बिळांत एक नाग होता. त्याला नळानें उचललें व विस्तवांतून बाहेर चांगल्या जागीं नेऊन ठेवलें. इतक्यांत तो नाग नळाला चावला; त्याबरोबर नळराजा निळा झाला. या नागाचें नांव कर्कोटक. कर्कोटक म्हणाला, "राजा, तूं हल्लीं संकटांत आहेस. ह्या निळ्या रंगांत तुला चटकन् कोणीही ओळखणार नाहीं. तुला जेव्हां हा रंग नकोसा वाटेल, तेव्हां माझें स्मरण कर. मग मी तुला पहिल्यासारखा करीन."

पुढें नळ अयोध्येला गेला आणि तेथील ऋतुपर्ण राजाकडे रथ हांकायला नोकरीस राहिला. इकडे दमयंती जागी होऊन पहाते, तो नळ नाहीं. मग ती तेथून रडत रडत चेदी देशाला पोहोंचली. तेथील राणीनें तिला आपल्याकडे ठेवून घेतली. भीम राजानें नळ-दमयंतीचा पुष्कळ शोध केला. शेवटीं दमयंती सांपडली. मग भीमराजानें दमयंतीला आपल्याबरोबर नेलें.

आतां फक्त नळाचाच पत्ता लागावयाचा राहिला; पण नळराजा कुठेंच आणि कोणाला सांपडेना. त्यासाठीं दमयंतीनें एक युक्ति केली. जिकडे तिकडे कळविलें कीं भीमराजाची मुलगी दमयंती हिचें उद्यां स्वयंवर आहे. देशोदेशींच्या राजांस पत्रिका गेल्या. त्यांत अयोध्येचा राजा ऋतुपर्ण ह्यालाही पत्रिका गेली. राजा ऋतुपर्ण नळाला म्हणाला, "आजच्या आज मला विदर्भ देशाला घेऊन चल, तरच तूं खरा सारथी." नळानें रथाला घोडे

जुंपले व एका दिवसांत रथ विदर्भ देशाला नेला. आपण लौकर आलों म्हणून ऋतुपर्ण राजाला आनंद झाला. इतक्यांत नळानें कर्कोटकाचें स्मरण केलें. तसा कर्कोटकानें नळाला पहिल्यासारखा केला. तेव्हां दमयंतीनें नळाला ओळखलें. मग ती नळाला म्हणाली, " आपली भेट झाली पाहिजे, म्हणून मी ही युक्ति केली. मला पुन्हा विवाह करावयाचा नव्हता ; स्वयंवर आहे, असें जाहीर केल्यामुळें आपण कुठेंहि असलां तरी याल व आपली भेट होईल, तो माझा हेतू सिद्धीस गेला. " नळाला आनंद झाला. नळ पुन्हा पुष्कळ संपत्ति घेऊन आपल्या देशाला गेला व पुष्कराला जिंकून त्यानें सर्व राज्य पुन्हा मिळविलें आणि पुष्कळ वर्षें राणीसह व मुलांसह आनंदानें राज्य केलें.

अभ्यास :—( १ ) नळाला शोधण्यासाठीं दमयंतीनें काय युक्ति केली ? ( २ ) नळराजाचें राज्य कां गेलें ? ( ३ ) निरनिराळ्या वाहनांचीं चित्रें जमवा. ( ४ ) निरनिराळीं वाहनें हांकणारे लोक वाहनांत कुठें बसतात व वाहनें कशीं हांकतात तें पहा. निरनिराळीं वाहनें हांकणारांना, निरनिराळीं नांवें आहेत ; तीं शिक्षकांस विचारा.

---

## ६. भीष्म

पूर्वी आपल्या देशांत शंतनू नांवाचा एक राजा होऊन गेला. त्याच्या राणीचें नांव गंगा. गंगेला एकामागून एक असे सात मुलगे झाले. पण ते सर्व मरण पावले. नंतर एक मुलगा झाला. राजानें त्याचें नांव ' देवव्रत ' असें ठेविलें. पुढें राणी मरण पावली.

राजानें देवव्रताचें उत्तम प्रकारें पालन केलें. सात मुलगे मरण पावले आणि हा आठवा व शेवटचा,

तेव्हां राजाचा तो फार आवडता होता आणि देवव्रतही सुशील, धीट, खरें बोलणारा व निश्चयी होता. त्यामुळें राजाप्रमाणें तो सर्व लोकांचाहि आवडता झाला.

देवव्रत सोळा वर्षांचा झाला. राजानें त्यास उत्तम प्रकारचें शिक्षण दिलें व आपल्यामागून 'देवव्रत' राजा होईल; असें आपल्या राज्यांत जाहीर केलें.

एके दिवशीं शंतनू फिरत असतां त्याला एक सुंदर तरुणी दिसली. तिला आपली राणी करावी, असें



राजाला वाटलें. राजानें चौकशी केली तेव्हां ती अधिरथ कोळ्याची सत्यवती नांवाची मुलगी आहे, असें समजलें. राजानें सत्यवतीला "तूं राणी व्हावयास कबूल आहेस का?" असें विचारलें. सत्यवती म्हणाली, "मी राणी होईन; पण तुमचा मुलगा देवव्रत गादीवर बसणार आहे, त्यामुळें माझ्या मुलाला कांहीं राज्य मिळणार नाहीं. यासाठीं देवव्रताला राजा न करतां जर माझ्या मुलाला राज्य द्याल, तरच मी राणी होईन."

राजाला हें एक संकटच वाटलें; कारण देवव्रत त्याचा फार आवडता होता. त्याला तर राजा करावयाचाच आणिं सत्यवतीला आपली राणीहिं करावयाची, अशा अडचणींत राजा सांपडला. राजाला कांहीं सुचेनासें झालें.

राजाला दुःखी पाहून देवव्रतानें चौकशी केली. तेव्हां सर्व हकीगत त्याला कळली. तो स्वतः सत्यवतीकडे गेला आणि आपल्या पित्याबरोबर लग्न करण्याविषयीं तिला विनवूं लागला. सत्यवती म्हणाली, "जर तूं माझ्या मुलाला गादीवर बसविण्याचें वचन देत असशील, तर मी शंतनूबरोबर लग्न करीन." ही गोष्ट देवव्रतानें कबूल केली. तो म्हणाला, "तुला मुलगा होईल त्याला मी राजा करीन, असें तुला वचन देतों, मग तर झालें ना?" सत्यवती म्हणाली, "ठीक, हें तूं करशीलच! पण पुढें तुझीं मुलें माझ्या मुलाबरोबर झगडतील व राज्य घ्यायला येतील, त्याचा काय विचार?" देवव्रत म्हणाला, "तर मग माझ्या पित्याच्या सुखासाठीं मी लग्नच करणार नाहीं, हाच माझा निश्चय!" हें ऐकून सत्यवती शंतनूबरोबर लग्न करण्यास तयार झाली. नंतर शंतनू व सत्यवती यांचें लग्न झालें. देवव्रतानें अखेरपर्यंत लग्न केलें नाहीं. अशाप्रकारें आपलें बोलणें त्यानें खरें केलें. ही 'भयंकर' प्रतिज्ञा करणारा, म्हणून देवव्रतास 'भीष्म' असें नांव पडलें. कौरवपांडवांच्या युद्धांत भीष्म कौरवांचे सेनापती होते. त्यांचें व अर्जुनाचें फारच भयंकर युद्ध झालें. अर्जुनाला भीष्म मुळींच आटोपेनात; तेव्हां शिखंडीच्या आड राहून अर्जुनानें भीष्मावर बाण सोडले व त्यांना मारलें.

**अभ्यास :**—(१) कोळी लोक कोणता धंदा करतात ? (२) कोळी स्त्रीपुरुषांचा पोषाख पहा. (३) लग्न न करतां, मरेपर्यंत देशासाठीं झटणारे थोर स्त्री-पुरुष आहेत. त्यांची माहिती शिक्षकांस विचारा. (४) देवव्रतास, लोक भीष्म कां म्हणूं लागले ? (५) निरनिराळ्या माशांचीं व होड्यांचीं चित्रें जमवा.

---

# ७. मूर्तीनें विद्या शिकविली !

एकलव्य हा भिल्लाचा मुलगा. बापानें त्याला बाण मारायला शिकविलें. तो हुशार होता. त्याला वाटे आपण खूप खूप शिकावें. मोठमोठ्या लढाया माराव्या. त्यावेळीं बंदुका नव्हत्या, तोफा नव्हत्या, बोटी नव्हत्या, विमानें पण नव्हतीं. जो बाण मारण्यांत हुशार, तोच त्यांचा राजा होई.

त्यावेळीं कौरव पांडव लहान होते; एकलव्यहि लहान होता. द्रोणाचार्य कौरवपांडवांना बाण मारायला शिकवीत. एकलव्याला वाटलें, आपणही द्रोणाचार्यांजवळ जावें. ते शिकवतील आपल्याला ! एकलव्य उठला, धनुष्यबाण घेतलें आणि गेला द्रोणाचार्यांकडे. तो म्हणाला, "मला शिकवतां का तुम्हीं ? द्रोणाचार्य म्हणाले, "हे आहेत राजपुत्र ! तूं आहेस भिल्ल. त्यांच्याबरोबर तुला शिकवितां येणार नाहीं." एकलव्याला फार वाईट वाटलें. पण तो रडत बसला नाहीं ! तो तसाच रानांत गेला. एक झोंपडी बांधली. त्याची झाली शाळा तयार ! पण गुरुजी कुठें होते ? त्याला तर द्रोणाचार्य गुरुजी हवे होते ! मग त्यानें घेतली माती आणि बनविली द्रोणाचार्यांची मूर्ति. ह्याच गुरुजींजवळ एकलव्य शिकूं लागला. तो त्यांना नमस्कार करीं, मग

बाण मारण्याचा अभ्यास करी. होतां होतां तो बाण मारण्यांत पटाईत झाला.

कांहीं दिवसांनीं द्रोणाचार्य रानांत आले. बरोबर सगळे राजपुत्र होते. शिकारी कुत्रे पण होते. हे सगळे फिरत फिरत झोंपडीजवळच्या झाडींत आले. एक कुत्रा पुढें आला. कुत्र्याला एकलव्य दिसला. एकलव्य डोळे झांकून बसला होता. कुत्रा मोठमोठ्यानें भुंकूं लागला. एकलव्य घाबरला नाहीं. तो चटकन् उठला, पटकन् बाण काढला आणि सूं ऽऽऽ करीत-सोडला कुत्र्यावर. कुत्रा पुढें पळूं लागला. बाण मागून धावूं लागला. कुत्रा द्रोणाचार्यांजवळ गेला. बाणही मागून गेला. कुत्रा थांबला पण बाण कुत्र्याभोंवतीं फिरूं लागला.



तो कुत्र्याला लागत नव्हता. सगळ्या राजपुत्रांना आश्चर्य वाटलें. द्रोणाचार्यांना पण आश्चर्य वाटलें. सर्वजण एकलव्याच्या झोंपडीजवळ गेले. झोंपडींत एक मुलगा बसला होता. त्याचे डोळे पाणीदार होते, अंग पिळदार होतें,

मुलगा तरतरीत पण शांत दिसत होता. राजपुत्रांनीं त्याला प्रश्न केला.

राजपुत्र :—आमच्या कुत्र्याला कोणीं बाण मारला ?

एकलव्य :—मीं बाण मारला !

राजपुत्र :—बरें, पण बाण सभोंवार फिरतो कसा ?

एकलव्य :—हेंच तर माझें कसब ! तो बाण कुत्र्याला मारील असें करूं का ?

राजपुत्र :—नको नको ! हा कुत्रा आमचा फार आवडता आहे ! पण ही विद्या तुला कोणी शिकविली ?

एकलव्य :—द्रोणाचार्य गुरुजींनीं ! हे पहा माझे गुरुजी !!

एकलव्यानें आपल्या अभ्यासाची सगळी हकीगत त्यांना सांगितली ! द्रोणाचार्यांना आनंद झाला, त्यांनीं एकलव्याला आशीर्वाद दिला.

पुढें लवकरच एकलव्य मोठा राजा झाला व त्यानें आपल्या प्रजेसाठीं पुष्कळ चांगलीं कामें केलीं.

अभ्यास :—( १ ) एकलव्याला द्रोणाचार्यांनीं कां शिकविलें नाहीं ? ( २ ) एकलव्यानें कोणता चमत्कार केला ? ( ३ ) निरनिराळ्या हत्यारांचीं व कुत्र्यांचीं चित्रें जमवा. ( ४ ) एक तिरकमठा तयार करा.

---

## ८. गमतीदार राक्षस

तुम्हांला पांडव माहीत आहेत ना ? त्यांतला भीम हा एक पांडव ! त्या भीमाचा एक मुलगा होता; त्याचें नांव घटोत्कच. घटोत्कच फारच दांडगा, लठ्ठच लठ्ठ आणि उंचच उंच होता. त्याचे ते लांब लांब केस, लाल आणि बटबटीत डोळे आणि भयंकर चेहेरा पाहून

लोक घाबरून जात. लांबून तर तो काळ्याकुट्ट डोंगरासारखा दिसे. मोठमोठीं झाडें तो पटापट उपटी. मोठ मोठे दगड तो चेंडूसारखे चटाचट फेकी. त्याचें बरेंच राक्षससैन्य होतें; तें पण असेंच होतें.

हे राक्षसलोक पाहिजे तीं सोंगें घेत. वाटेल तेव्हां दिसेनासे होत आणि वाटेल तेथें अकस्मात् दिसूं लागत.



आकाशांत विमानासारखे उडूनही जात. अशा कितीतरी गमती करीत.

आज कर्णाबरोबर घटोत्कचाची लढाई सुरू होती. आजच्या लढाईंत कर्णानें खूपच राक्षस मारले; आणि घटोत्कचानें पण कर्णाचें पुष्कळ सैन्य मारलें. कर्ण फारच चिडला आणि तो जोराची लढाई करूं लागला. घटोत्कचहि जोरानें लढूं लागला. कौरवांचे खूप लोक मरूं लागले. आतां मात्र कर्णाचे बाण घटोत्कचास लागूं लागले. तेव्हां घटोत्कच चटकन् उडाला आणि भुर्कन आकाशांत गेला. आकाशांतून कौरवांच्या अंगावर दगड, भाले, बाण येऊं लागले. त्यामुळें कौरवांचें सैन्य फारच मरूं लागलें. कर्ण इकडे

तिकडे पाहूं लागला, पण घटोत्कच कुठें दिसेना ! कर्णाचें सैन्य ओरडूं लागलें. "कर्णा, कर्णा आम्हांला वांचव; आम्हीं मरतों ! तुझ्याजवळ इंद्रानें दिलेला बाण आहे, तो मंत्र म्हणून सोड, नाहींतर आमची धडगत नाहीं."

कर्णानें तो बाण जपून ठेविला होता. त्या बाणानें तो अर्जुनाला मारणार होता. पण करतो काय? कर्ण विचारांत पडला. भात्यांतून तो बाण कर्णानें बाहेर काढला. मंत्र म्हटला आणि सोडला घटोत्कचावर. घटोत्कच लोकांना दिसत नव्हता, तरी बाणानें घटोत्कचाला शोधून काढिलेंच ! बाण सूंऽसूं लख्ऽलख् करीत आकाशांत गेला आणि घटोत्कचाच्या छातींत घुसला. झालें ! आकाशांतून मोठा थोरला काळा डोंगर, खालीं डोकी व वर पाय करून झपाट्यानें खालीं येऊं लागला. तो घटोत्कच होता. पडतां पडतां घटोत्कचानें मनांत विचार केला, आतां आपण मरणारच, पण मरतां मरतां तरी आपल्या लोकांचा कां फायदा करूं नये? तेव्हां तो एकदम कौरवांच्या सैन्यावर आडवा पडला. त्याच्या एवढ्या मोठ्या अंगाखालीं किती तरी सैन्य, हत्ती, घोडे व रथ चिरडून नाहींसे झाले.


घटोत्कच मरण पावला. पांडवांना वाईट वाटलें. पण कृष्ण हंसत हंसत म्हणाला, "आतां अर्जुनाला भीति नाहीं" कारण हा बाण जर कर्णाजवळ असता, तर खात्रीनें अर्जुनाला मृत्यु आला असता.

अभ्यास :—( १ ) पांडवांचीं नांवें ओळीनें सांगा. ( २ ) राक्षसांना कोणकोणत्या गमती करतां येत? ( ३ ) मायाबाजार हा चित्रपट तुम्ही पहा. ( ४ ) घटोत्कचाला बाण लागतांच कृष्ण कां हांसत होता?

गाळलेला शब्द भरून ओळी लिहा. ( १ ) कर्णाला × बाण दिला होता. ( २ ) घटोत्कच × सैन्यावर पडला.

# ९. नदींत सांपडलेला मुलगा

तुम्हांला कौरव पांडवांची गोष्ट माहीत आहे ना? पांडव हे पंडूचे मुलगे व कौरव धृतराष्ट्राचे मुलगे. या धृतराष्ट्राचा एक रथ हांकणारा माणूस होता. त्याचें नांव अधिरथ. रथ हांकणाराला सारथी म्हणतात. अधिरथाची बायको राधा. हिला मूलबाळ नव्हतें. फार वाईट वाटे त्यांना आपल्याला मुलगा नाहीं म्हणून.



एकदां काय झालें, अधिरथ नदीच्या कडेनें फिरत फिरत चालला होता. त्याला एक वहात येणारी पेटी दिसली. अधिरथ नदींत उतरला. त्यानें पेटी पकडली आणि ती उघडली. तींत एक मुलगा होता. अधिरथाला फार आनंद झाला. मुलगा नेऊन त्यानें राधेजवळ दिला. राधेलाही आनंद झाला. राधेनें मुलाचें नांव ' वसुषेण ' असें ठेवलें. त्यालाच कर्ण म्हणत.

कौरव पांडवांना लढाईचें शिक्षण द्रोणाचार्यांनीं दिलें. त्यांची चालली होती परीक्षा. अर्जुनानें उत्तमच कौशल्य दाखविलें. सर्वांनीं अर्जुनाची वाहवा केली. पण हें दुर्योधनास सहन झालें नाहीं. तो मनांतून जळफळूं लागला. इतक्यांत कर्ण पुढें आला. सगळेजण कर्णाकडे पाहूं लागले. कर्ण म्हणाला, " अर्जुना, तूं चढून जाऊं नकोस ! माझें कौशल्य पहा ! तुझ्यापेक्षांहि मी कौशल्य दाखवीन ! तूं नको मोठेपणा दाखवूं. पाहिजे तर लढायला ये ! मी तुझ्याबरोबर लढायला तयार आहें. " पण इतक्यांत " तूं सारथ्याचा मुलगा. तुझ्याबरोबर राजपुत्र लढायला तयार नाहीं. " असें म्हणून अर्जुनानें त्याला लाजविलें. कर्णाला लाज वाटली. पण दुर्योधन पुढें आला. त्याला अर्जुना-सारखा पराक्रमी कोणीतरी पाहिजे होता. तो आयता कर्ण मिळाला. दुर्योधनानें त्याला अंगदेशचा राजा केला. आतां, कर्ण राजा झाला.

पुढें कौरव पांडवांचें युद्ध सुरू झालें. त्यावेळीं एकदां कर्ण दुर्योधनाचा सेनापति होता. कर्णानें प्रतिज्ञा केली कीं " उद्यां अर्जुनाला ठार करणार. "

अर्जुनाची आई कुंती कर्णाकडे आली आणि म्हणाली, " कर्णा, बाळा, मी तुझ्याकडे कांहीं मागायला आलें आहें. "

कर्ण म्हणाला, " तूं अर्जुनाची आई, मला बाळ कां म्हणतेस ? मी राधेचा मुलगा. तिनें मला ' बाळ ' म्हटलें तर चालेल. "

कुंती म्हणाली, " मी तुझी आईच आहें. लहानपणीं मी तुला सोडलें, राधेनें तुझें पालन केलें. तूं पांडवांचा मोठा भाऊ आहेस. म्हणून अर्जुनाला मारूं नकोस. "

कर्ण म्हणाला, " कुंती, मी जर पांडवांचा भाऊ आहें म्हणतेस, तर मी किंवा अर्जुन कोणीतरी एक मेल्यास बाकी पांचच पांडव राहातील. म्हणून तुला वाईट वाटण्याचें कारण नाहीं. मी दुर्योधनाची बाजू सोडणार नाहीं. " कुंती निघून गेली.


पुढें अर्जुन व कर्ण यांची लढाई झाली. कर्णाच्या पुढें कोणीच टिकेना. सगळे भिऊं लागले. कर्ण आतां अर्जुनावर बाण सोडणार, तोंच कर्णाच्या रथाचें चाक जमिनींत रुतलें. सारथ्याला तें कांहीं बाहेर काढवेना. मग कर्ण खालीं उतरला व रथाचें चाक वर काढूं लागला. तोंच अर्जुनानें बाण सोडून कर्णास ठार केलें. कुंतीस फार वाईट वाटलें. पुढें, पांडवांस कळलें, कर्ण हा आपलाच भाऊ होता; तेव्हां त्यांनाहि फार वाईट वाटलें. पण आतां इलाज काय? मग कर्णाचा मुलगा 'वृषसेन' हा पांडवांकडेच राहिला.

अभ्यास : ( १ ) शब्द भरा :— ( अ ) अधिरथाला नदींत एक......वहात असलेली दिसली. ( ब ) दुर्योधनाला........सारखा पराक्रमी कोणी तरी पाहिजे होता. ( २ ) कर्ण कुणाचा मुलगा होता? ( ३ ) कर्ण उदार व शूर होता; ह्यांबद्दलच्या गोष्टी वडील माणसांस विचारा.

# १०. आस्तिक

फार फार वर्षांची गोष्ट! एक होता राजा, त्याचें नांव परिक्षिति. त्याला एक होता मुलगा, त्याचें नांव जनमेजय.

एके दिवशीं परिक्षिति राजाला तक्षक नांवाच्या नागानें दंश केला व राजा मरण पावला. जनमेजयाला दुःख झालें. तक्षक नागाचा फार फार राग आला. जनमेजय तक्षकाचा शोध करूं लागला. तक्षक नाग पळाला. तो कुठेंही सांपडेना.



मग जनमेजयानें एक युक्ति केली. ब्राह्मण बोलावले. एक विस्तवाचें कुंड तयार केलें आणि सगळे नाग कुंडांत येऊन पडावे, असे मंत्र ब्राह्मणांस म्हणावयाला सांगितलें. ब्राह्मण मंत्र म्हणूं लागले. कुंड रणारण पेटूं लागलें. नाग येऊन पटापट कुंडांत पडूं लागले व ते जळून मरूं लागले. जनमेजयाला आनंद झाला. तो मनांत म्हणाला, आतां तक्षक नाग येईल. कुंडांत पडेल. जळून मरेल! तक्षक भिऊन गेला. आतां काय करावें? तो

पळत पळत इंद्राकडे गेला. इंद्र देवांचा राजा. इंद्र त्याचें रक्षण करीना. तक्षकाला आतां कांहीं उपाय सुचेना. तो कांपत कांपत कुंडाकडे आला. बहुतेक नाग कुंडांत पडले होते आणि आतां तक्षकही कुंडांत पडणार, इतक्यांत तेथें एक मुलगा आला आणि त्यानें तक्षकाला वांचविलें.

या मुलाचें नांव आस्तिक. याच्या आईचें नांव जरत्कारू आणि बापाचेंही नांव जरत्कारू. नागांचा राजा जो वासुकी, त्याची ही मुलगी. जरत्कारू हा ब्राह्मण होता.

जरत्कारूनें आस्तिकाला खूप खूप शिकविलें. आस्तिक गोड गोड बोले. आईबापांचें ऐके, त्यांना मान देई. आपले भाउबंद कुंडांत पडून मरूं लागले हें जरत्कारूला पाहवेना ! ती आस्तिकाला म्हणाली, " बाळा, आत्तांच्या आत्तां जा ! आणि नागांना वांचीव. "

आईची आज्ञा मान्य करून आस्तिक निघाला. जनमेजया-जवळ गेला. त्यानें राजाला गोड गोड बोलून खूष केलें. राजा म्हणाला, " तुला काय पाहिजे ? तूं ब्राह्मण आहेस ! तुला पाहिजे तें माग ! " राजाला काय माहीत ? कीं आस्तिक तक्षकाला वांचवायला सांगणार आहे हें ! पण आस्तिकानें सांगितलें, " राजा, माझी इच्छा पूर्ण करावयाची असेल तर तक्षकाला जाळूं नकोस. आणि आतां हें कुंड बंद कर ! हेंच मला दे. "

राजा म्हणाला, " एवढें कृपा करून मागूं नको ! तुला हवे तितके पैसे देतों. हिरेमाणकें देतों. पाहिजे तर राज्य देतों. "

आस्तिक म्हणाला, “मला पैसे नकोत. हिरेमाणकें नकोत. राज्य पण नको. माझ्या आईची इच्छा पूर्ण झाली पाहिजे; म्हणून मीं तुझ्याजवळ ही मागणी मागत आहें. तूं आत्तांच हें कुंड बंद कर! तक्षकाला जाळूं नकोस!” ब्राम्हणाचें म्हणणें राजाला कबूल करावें लागलें! राजानें कुंड बंद केलें. ब्राह्मणांनीं मंत्र बंद केले. नाग कुंडांत पडण्याचें बंद झालें. तक्षक वांचला. आस्तिक आनंदित झाला. आस्तिकाच्या आईला पण आनंद झाला.

अभ्यास :—( १ ) नको असलेले शब्द खोडा. ( अ ) जरत्कारू ही ( इंद्राची, राजाची, वासुकीची, ) मुलगी. ( आ ) आस्तिकानें राजाला कुंड ( सुरू करण्यास, बंद करण्यास, वाढविण्यास ) सांगितलें. ( २ ) ( क ) जनमेजय राजा हा कोणाचा मुलगा? ( ख ) जनमेजय राजा सापांना कां जाळीत होता? ( ग ) तक्षकाला कोणी सोडविलें? ( ३ ) सापाचें चित्र काढा. नागाची पूजा कधीं करतात? तो दिवस कोणता? कोणत्या देवानें नागाला डोकींत ठेवला आहे?

म. ग्रं. शाखा.
क्रा. क्र. 2530
दि.

IRBK-0102530
IRBK-0102530

# सुंदर सुंदर वेचलेलीं र..

## तीन पढत मूर्ख

लेखक **मा. के. काटदरे**

बैलगाडी आजारी पडून मेली ?... होय बुवा. निदान चारी वेद शिकलेल्या या पढतमूर्खांनीं तरी सांगितलें !... बहीण व भाऊ आणि 'धोंडे वाढत कां नाहींत' याही गोष्टी अशाच विचित्र !

मूल्य ५ आणे

## जांवई बापू

लेखिका **कावेरी कर्वे**

एकापेक्षां एक और अशा दहा जांवयांच्या दहा गोष्टी. त्यांतला एक होता खादाड, एक विद्वान् ( ! ), एक रातांधळा, एक सांगकाम्या, एक गांवढळ...आणि एक तर 'बनला' होता ज्योतिषी !

मूल्य ४॥ आणे

## जगांतील शिशुकथा १-२-३

ले० भा. गो. व सौ. प्रभावती जोशी

निरनिराळ्या देशांतली छोटीं छोटीं मुलें या सुंदर गोष्टी शेकडो वर्षें ऐकत आलीं आहेत, आणि तरी त्यांच्यांतली माधुरी मुळींसुद्धा कमी झालेली नाहीं.

मूल्य १–२ प्र. ६॥, ३ रा ८ आणे

## अंधेरीनगरींतील न्याय

लेखक **मा. के. काटदरे**

अंधेरी नगरीच्या गंडुराजानें दिलेला न्याय ऐकून तुम्हांला पोट धरधरून हसावेंसें वाटेल. काकवी खाणाऱ्या जांवयाची आणि युक्तिवान् मुलीची, या दोन गोष्टीही गमतीदार आहेत.

मूल्य ५ आणे

## वाघाची मावशी

लेखिका **आनंदीबाई शिर्के**

दाट जंगलांत राहाणाऱ्या या मावशीबाई माणसाच्या घरांत कशा राहायला आल्या ? शिवाय 'आंधळ्यांची माळ' 'नियम तो नियम' 'सुरणाचा हलवा' 'सवाया' 'संख्याबळ' या छान गोष्टी.

मूल्य ४॥ आणे

## अद्भुत कथा १-२

लेखक **म. का. कारखानीस**

'गडबडमामा' 'झिंगूजी' 'जादूचा लाडू' या गोष्टी नांवाप्रमाणेंच मजेदार आहेत. दुसऱ्याही गोष्टी जगांतल्या सुंदर सुंदर परीकथा आहेत.

मूल्य प्रत्येकीं ५॥ आणे

**कर्नाटक प्रकाशन संस्था,** श्रीसमर्थ–सदन : २ गिरगांव बाजार, मुंबई २